

# ।। श्री धन्वन्तरी आरती ।।

नमामि धन्वन्तरीमादिदेवं सुरासुरैर्वन्दितपादपङ्कजम् ।
लोके जरारुग्भयमृत्युनाशनं दातारमीशं विविधौषधीनाम् ।।
शङ्खं चक्रं जलौकां दधदममृतघटं चारुदोभिश्चतुर्भिः ।
सूक्ष्मस्वच्छातिहृद्यांशुकपरिविलसन् मौलिमम्भोजनेत्रम् ।
कान्लाम्भोदोज्ज्वलाङ्गम् कटितटविलसच्चारुपीताम्बराढयम् ।
वन्दे धन्वन्तरीं तं निखिलगदवनप्रौढदावाग्निलीलम् ।।

कमलनयन शामवर्ण पीतांबर साजे
मनमोहन वस्त्राने आदिदेव विलसे
शंख चक्र जलौका अमृतघट हाती
चतुर्भुजांनी अवघ्या दु:खाला पळवी ।।१।।

जयदेव जयदेव धन्वन्तरी देवा
सकळजनांना द्यावा आरोग्य ठेवा ।।धृ।।

देवांनी दैत्यांनी मंथन ते केले
त्यातुन अमृतकलशा घेऊनिया आले
भयदु:ख सरण्या जरा मृत्यु हरण्या
सकळांना त्याचे संजीवन झाले ।।२।।

शास्त्रांचे परिशीलन अनुभव कर्मांचा
बुद्धीने तर्काने तत्पर ती सेवा
शुचिर्दक्ष सत्यधर्म संयत उदारता
श्रीकान्तासह साऱ्या आशिर्वच द्यावा ।।३।।

**Dr. Shrikant Wagh**
**Rheumatologist Pune (INDIA)**
• sywagh@yahoo.co.in • www.arthritis-india.com